# मिरा-भाईंदर,वसई- विरार आयुक्तालय

विषय :- दिनांक- ०१/१२/२०२२ रोजीचे पेपर कात्रणाबाबत.

१) गुन्हेगारी घटना २) कायदा व सुव्यवस्था ३) राजकीय घटना ४) इतर

| अ. क्र. | दिनांक | वर्तमान पत्राचे नांव | बातमीचा मथळा (Heading) | संबंधीत पो.ठाणे | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १. | ०१.१२.२०२२ | पुढारी पु. पा. ०३ | मिरा-भाईंदरमध्ये पोलीस भरती दोन मैदानात होणार | मि.भा.व.वि. | |
| २. | ०१.१२.२०२२ | पुढारी पा. नं .ा | शिवरायांची तुलना नाही, केवळ उदाहरण दिले . लोढा | इतर | |
| ३. | ०१.१२.२०२२ | पुढारी पा. नं .०५ | शिक्षा भोगून आलेल्या आरोपीस अटक | मिरारोड | |
| ४. | ०१.१२.२०२२ | लोकमत पु. पा .०१ | "त्या" बांधकामाच्या चौकशीचे आदेश | मिरा-भाईंदर | |
| ५. | ०१.१२.२०२२ | सामना पा. नं .०७ | घोडबंदर रोडवर मेट्रोच्या कामासाठी "नाईट ब्लॉक" | मि.भा.व.वि. | |
| ६. | ०१.१२.२०२२ | सकाळ पु. पा. ०१ | वसईची कचरा कोंडी फुटणार | वसई-विरार | |
| ७. | ०१.१२.२०२२ | लोकमत पा. नं .०२ | पोलिसांनी नोंदविली नव्हती श्रध्दा बेपत्ता झाल्याची तक्रार | माणिकपूर | |
| ८. | ०१.१२.२०२२ | लरेकसत्ता पु. पा .०३ | अनैतिक प्रकाराबद्दल मानवी हक्क आयोगाची तीव्र नाराजी | उत्तन | |

पुढारी पु.पा. ३.

# मिरा भाईंदरमध्ये पोलीस भरती दोन मैदानात होणार

**मिरारोड : पुढारी वृत्तसेवा**

मीरा-भाईंदर शहरात पोलीस भरतीसाठी शहरातील भाईंदर पश्चिमेचे नेताजी सुभाषचंद्र बोस मैदान व भाईंदर पूर्वेचे जेसलपार्क परिसरातील मैदानात भरती प्रक्रिया केली जाणार आहे. मीरा भाईंदर महापालिकेने मैदाने वापरण्यासाठी परवानगी दिली आहे. संपूर्ण पोलीस भरती पारदर्शकपणे पार पाडण्यासाठी प्रत्येक स्तरावर विशेष उपाययोजना करण्यात येणार असल्याची माहिती पोलीस उप आयुक्त प्रकाश गायकवाड यांनी दिली आहे.

महाराष्ट्रात गेल्या काही वर्षांपासून पोलीस भरती झाली नव्हती. यावर्षी मोठ्या प्रमाणात पोलीस भरती करण्यात येत आहे. पोलीस भरतीचे अर्ज करण्यासाठी ३० नोव्हेंबर पर्यंत मुदत देण्यात आली होती. परंतु अर्ज भरताना तांत्रिक अडचणी आल्यामुळे अनेकांना अर्ज भरता आले नव्हते. त्यामुळे १५ दिवसांची मुदतवाढ देण्यात आली असून आता १५ डिसेंबर पर्यंत अर्ज दाखल करता येणार आहे. गेल्या काही वर्षांपासून तरुण भरतीची प्रतीक्षा करत होते. त्यामुळे तरुण हे मोठ्या प्रमाणात अर्ज भरत आहेत. भरतीसाठी आलेल्या उमेदवारांना मैदान कमी पडू नये यासाठी पोलीस विभागाकडून तयारी सुरू केली आहे. त्यामुळे मीरा-भाईंदर शहरात पोलीस आयुक्तालयाकडून दोन मैदानांची निवड करण्यात आली आहे. परंतु कमी अर्ज आले तर एकाच मैदानाचा वापर केला जाणार असल्याचे पोलीस उप आयुक्त गायकवाड यांनी सांगितले आहे. मीरा-भाईंदर,वसई विरार पोलीस आयुक्तालयात सध्या ३,३३१ मनुष्यबळाची मंजूर पदे असून त्यापैकी फक्त २,२६७ मनुष्यबळ हजर आहे. मंजूर मनुष्यबळापेक्षा १०६४ पोलीस अंमलदारांची पदे रिक्त आहेत. नवीन पोलीस भरतीमुळे आयुक्तालयातील पोलीस दलामध्ये ९९६ पोलीस अंमलदारांची भर पडणार आहे. ज्या मैदानात भरती प्रक्रिया राबवण्यात येणार आहे. पोलीस खात्यात भरती होण्यासाठी शहरातील तरुणांना शहराबाहेर जावे लागत होते. शहरातच पोलीस भरतीची संधी उपलब्ध झाल्याने तरुणांनी आनंद व्यक्त केला आहे.

## वाहतूककोंडी होण्याची शक्यता

भरतीच्या कालावधीत मैदानांच्या बाहेर मोठ्या प्रमाणात तरुणांची गर्दी होणार आहे. त्यामुळे वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होण्याची शक्यता आहे. वाहतूकीवर नियंत्रण ठेवण्यासाठी जास्त पोलीस बळ मागवण्यात आले आहे. तसेच तरुणांची गैरसोय होऊ नये यासाठी तरुणांना आवश्यक सोइ सुविधा पुरवल्या जाणार आहेत.

पुढारी पा.नं. ११

# शिवरायांशी तुलना नाही, केवळ उदाहरण दिले : लोढा

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**



मी छत्रपती शिवाजी महाराजांशी कोणाचीही तुलना केली नाही, मी केवळ त्यांच्या आग्र्याच्या सुटकेचे उदाहरण दिले आहे, असा खुलासा पर्यटनमंत्री मंगलप्रभात लोढा यांनी केला आहे.

महाराष्ट्रात छत्रपती शिवाजी महाराजांचे उदाहरण प्रत्येक मुलाला दिले जाते. त्यांच्या जन्मापासून त्याला शिकवले जाते की छत्रपती शिवाजी महाराज कसे होते? मग तेव्हा काय त्यांची तुलना केली जाते का? याविषयी ज्याप्रकारे राजकारण केले जात आहे ते व्हायला नको. छत्रपती शिवाजी महाराज तळपता सूर्य होते. त्यांची त्याच स्थानावर पूजा केली पाहिजे. आपल्या राजकीय स्वार्थासाठी त्यांना वादात आणणे बंद करा, असा हल्ला त्यांनी विरोधकांवर चढविला.

शिवप्रताप दिनानिमित्त छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन करण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि लोढा प्रतापगडावर गेले होते. या ठिकाणी लोढा यांनी केलेल्या एका विधानाने आणखी एक नवा वाद निर्माण झाला आहे. यावर विरोधी पक्षनेते अजित पवार, आदित्य ठाकरे यांच्यासह विरोधी पक्षातील नेत्यांकडून लोढांवर टीका करण्यात आली. या टीकेवर लोढा यांनी पत्रकारपरिषद घेत आपली बाजू मांडली.

### उचलली जीभ लावली टाळ्याला सहन करणार नाही : अजित पवार

● उदाहरण देताना छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव घेता हेच चुकीचे आहे. 'या' उदाहरणाची आणि 'त्या' उदाहरणाची तुलनाच होऊ शकत नाही. उगाच काहीतरी उचलली जीभ लावली टाळ्याला असं कसं चालेल? छत्रपती शिवाजी महाराज आमचे दैवत आहे त्यामुळे हे आम्ही सहन करणार नाही, असा इशारा विधानसभेचे विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी दिला.

विरोधकांना बोलायचा अधिकार आहे. पण जे झाले नाही आणि जे टीव्ही किंवा सोशल मीडियावर सुरू आहे, ते राष्ट्रवादीचे नेते बोलत आहेत. मी नेमके काय बोललो ते त्यांनी बघावे. मी फक्त उदाहरण दिले आहे. मी कधीही तुलना केली नाही आणि करू शकत नाही. छत्रपती शिवाजी महाराज सूर्य आहेत. मग त्यांची तुलना करण्याचा मूर्खपणा कोणी का करेल. मी तर तो कधीच करणार नाही, असे लोढा म्हणाले.

मी कधीच वैयक्तिक टिपण्णी आणि राजकारणातही पडत नाही. मला सरकारचे काम सकारात्मकतेने करायचे आहे. हे जे काही सुरू आहे ते आता बंद केले पाहिजे, असे आवाहन त्यांनी विरोधकांना केले.

पुढारी पा.नं. ५

## शिक्षा भोगून आलेल्या आरोपीस अटक

**मिरारोड** - मोक्का सारख्या गंभीर गुन्ह्यामध्ये १० वर्ष शिक्षा भोगून आलेल्या अजय बलराम मंडल या आरोपीला अग्निशस्त्रासह मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेने अटक केली आहे. मिरा-भाईन्दर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील विशेषत: वसई-विरार परिसरात अवैध शस्त्रांवर आळा बसण्यासाठी वरिष्ठ पोलीस अधिकारी यांनी मार्गदर्शनात्मक सूचना दिलेल्या आहेत. त्याअनुषंगाने मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेतील अधिकारी व अंमलदार हे तपास करत असतांना सपोनि दत्तात्रय सरक, हवालदार शिवाजी पाटील, गोविंद केंद्रे यांना एक इसमाकडे अग्निशस्त्र असून तो नालासोपारा पूर्व, रशिद कम्पाउन्ड याठिकाणी येणार असल्याची माहिती मिळाली . त्यानुसार मध्यवर्ती गुन्हे प्रकटिकरण पथकाने सापळा रचुन २९ नोव्हेंबर रोजी अजय बलराम मंडल (वय ३५) यास ताब्यात घेवुन त्याची अंगझडती घेतली असता त्याच्याजवळ विनापरवाना १ गावठी बनावटीचा कट्टा, ८ जिवंत पितळी धातुचे काडतुसे व रोख रक्कम असा ४१,३०० रुपये किंमतीचा माल मिळुन आला. तसेच त्याने पोलीस उपआयुक्त (मुख्यालय) मिरा-भाईंदर वसई-विरार यांचे प्राणघातक हत्यारे जवळ बाळगण्यास मनाई आदेशाचा भंग केल्याने त्यास पुढील कायदेशीर कारवाई साठी पेल्हार पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे. त्याच्या विरुद्ध पेल्हार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अजय बलराम मंडल हा सराईत गुन्हेगार असुन त्याच्या विरुद्ध विविध पोलीस ठाण्यात अनेक गुन्हे दाखल असून त्याने एम.सी.ओ.सी. अॅक्ट अन्वये १० वर्षे कारावास भोगलेला आहे.

लोकमत पृ.५१९

# 'त्या' बांधकामाच्या चौकशीचे आदेश

## हरित लवादाचा विकासकाला दणका

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** मीरा रोडचा नवीन सृष्टी बांधकाम प्रकल्प हा पर्यावरण नियमांचे उल्लंघन करून होत असल्याच्या याचिकेची हरित लवादाच्या पश्चिम खंडपीठाने दखल घेत सिया (महाराष्ट्र पर्यावरण प्रभाव मूल्यांकन प्राधिकरण), एमपीसीबी (महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ) व एमसीझेडीएमए (महाराष्ट्र राज्य सागरी किनारा व्यवस्थापन प्राधिकरण) यांची त्रिसदस्य समिती नियुक्त करून स्वयंस्पष्ट अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत.

पूर्वेला एव्हरस्माईल प्रा.लि. यांनी सृष्टी, कल्पतरू नावाने मोठ्या वसाहती विकसित केल्या आहेत. त्यांच्या सृष्टी सेक्टर -२ (अ) नावाने नवीन गृहनिर्माण प्रकल्पाचे बांधकाम सुरू आहे. याचिकाकर्ते इरबा कोनापुरे व साबीर सय्यद यांनी हरित लवादाकडे दाखल याचिकेत मौजे पेणकर पाडा येथील सर्व्हे क्रमांक ६५, ६८, ६९ आदी ठिकाणी सीआरझेड १ व २ मध्ये तसेच उच्चतम भरती रेषा असलेल्या जागेवर महापालिकेकडून बांधकाम परवानगी देण्यात आली आहे.

हरित लवादाच्या न्यायाधीश दिनेश सिंह व डॉ. विजय कुलकर्णी यांच्या खंडपीठाने त्रिसदस्य समिती नियुक्तीचे आदेश दिले आहेत. याचिकाकर्त्यांच्यावतीने ज्येष्ठ वकील नितीन लोणकरसह ॲड. सोनाली सूर्यवंशी, ॲड. तानाजी गंभीरे यांनी बाजू मांडली.

### पर्यावरण विभागाची परवानगीच नाही

- पालिकेने विकासकाम सीआरझेडची परवानगी घेऊन मग बांधकाम करावे, असे कळवले असतानाही शासनाच्या पर्यावरण विभागाची परवानगी न घेता विकासकाने बेसमेंट अधिक, तळ, पोडियम अधिक नऊ मजल्याच्या इमारतीचे बांधकाम होत आहे.
- याठिकाणी मोठ्या प्रमाणात खोदकाम करण्यात आले आहे. तसेच येथील शेकडो झाडे तोडण्याची पालिकेने परवानगी दिली व झाडे तोडली गेली आहेत.

सामना पा.नं.८.

# घोडबंदर रोडवर मेट्रोच्या कामासाठी 'नाईट ब्लॉक'

## अवजड वाहनांना पूर्ण प्रवेश बंदी; हलक्या वाहनांना सर्व्हिस रोडचा पर्याय

ठाणे, दि. ३० (प्रतिनिधी) – कोपरी रेल्वे पुलाच्या गर्डर लाँचिंगचे काम गेल्याच आठवड्यात पूर्ण झाल्यानंतर या मार्गावरील पुलाच्या कामादरम्यान घेतला जाणारा ब्लॉक तूर्तास बंद करण्यात आला आहे. आता घोडबंदर रोडवरील मेट्रो मार्गिकेच्या कामाला वेग आला असून त्यासाठी या मार्गावर येत्या शनिवार ३ डिसेंबरपर्यंत 'नाईट ब्लॉक' घेण्यात आला आहे. या काळात अवजड वाहनांना घोडबंदर रोडवर मध्यरात्री प्रवेश बंदी करण्यात आली असून पर्यायी मार्गाने ही वाहतूक वळवण्यात आली आहे. तर हलक्या वाहनांनी सर्व्हिस रोडचा वापर करावा, असे आवाहन ठाणे वाहतूक शाखेच्या वतीने करण्यात आले आहे.

'घाटकोपर ते गायमुख' या मेट्रो चार प्रकल्पाचे काम एमएमआरडीएच्या माध्यमातून सध्या प्रगतिपथावर आहे. यातील घोडबंदर रोडवर मेट्रो मार्गिकेच्या कामासाठी शनिवारपर्यंत दररोज रात्री ११.५५ ते पहाटे ४ पर्यंत अवजड वाहनांना बंदी असेल.

### या पर्यायी मार्गाचा वापर करा

मुंबई–नाशिक महामार्गाने घोडबंदर रोडच्या दिशेने जाणाऱ्या सर्व जड, अवजड वाहनांना कापूरबावडी जंक्शन येथे प्रवेश बंद करण्यात आला आहे. ही वाहने माजिवडा पूल येथून खारेगाव टोलनाका, मानकोली, अंजूर फाटा मार्गे इच्छित स्थळी जातील किंवा कापूरबावडी जंक्शन येथून बाळकूम, कशेळी, अंजूर फाटा मार्गे रवाना होतील. तसेच मुंब्रा, कळवा येथून घोडबंदर रोडच्या दिशेने जाणाऱ्या वाहनाना खारेगाव टोलनाका येथे प्रवेश बंदी असेल. ही वाहने गॅमन मार्गे खारेगाव खाडी पुलाखालून खारेगाव टोलनाका, मानकोली, अंजूर फाटा मार्गे इच्छित स्थळी जातील.

सकाळ ५-५-१७

# वसईची कचरा कोंडी फुटणार

## २२५ कोटींच्या प्रकल्पासाठी निविदा प्रक्रिया सुरू

वसई, ता. ३० (बातमीदार) : शहरातील जवळपास १५ लाख टन कचरा हा भोईदापाडा कचराभूमीवर साचला आहे. त्यामुळे या कचऱ्याची विल्हेवाट कशी लावावी, असा प्रश्न प्रशासनासमोर उभा राहिला आहे. या कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी २२५ कोटींचा प्रकल्प उभारण्यात येणार आहे. यासाठी निविदा प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

वसई-विरार शहरात दररोज ७०० मेट्रिक टन इतका कचरा निर्माण होत आहे. एकीकडे महापालिका प्रशासन शून्य कचरा मोहीम राबवणार, असे म्हणत असली तरी त्याला यश येत नसल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे कचराभूमीला डोंगराचे स्वरूप आले आहे. आता या कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी २२५ कोटींचा प्रकल्प उभारण्यात येणार आहे. यासाठी निविदा प्रक्रिया महापालिकेने राबवली आहे. त्यानुसार सात दिवसांपूर्वी महापालिकेने ऑनलाईन निविदा जाहीर केली आहे. महापालिका नव्याने उभारण्यात येणाऱ्या प्रकल्पावर कोणताही खर्च करणार नसून कंपनीने विल्हेवाट लावण्यासाठी व त्यातून मिळणाऱ्या उत्पन्नावर प्रकल्प उभारायचा आहे. यामुळे महापालिकेची मोठी आर्थिक बचत होणार आहे. कचरा व्यवस्थापन प्रकल्प जी कंपनी हाती घेणार त्यांना पूर्वी जमा झालेला कचरा टप्प्याटप्प्याने व शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लावण्याची जबाबदारी पार पाडावी लागणार आहे.



वसई : शहरात ठिकठिकाणी कचऱ्याचे ढीग साचले आहेत.

### असा आहे प्रकल्प

| | |
|---|---|
| प्रकल्पाची किंमत | २२५ कोटी |
| प्रकल्पाचे क्षेत्रफळ | २५ एकरावर |
| निविदा प्रसिद्ध | २२ नोव्हेंबर |
| अंतिम तारीख | ६ डिसेंबर |



### २० हजार नवीन कचराकुंड्यांची खरेदी करणार

वसई-विरार महापालिका हद्दीत कचराकुंड्यांची कमतरता आहे, त्यामुळे कचरा जमा करण्यास अडचणी येत आहेत. तसेच नागरिकांकडून नव्या कचराकुंड्या बसवण्याची मागणी वारंवार होत आहे. ही मागणी लक्षात घेत २० हजार नव्या कचराकुंड्या महापालिका खरेदी करणार आहे, असे पालिकेच्या स्वच्छता विभागाकडून स्पष्ट करण्यात आले.

वसई-विरार महापालिकेकडून घनकचरा व्यवस्थापनासाठी प्रयत्न सुरू आहेत. यानुसार कचरा प्रकल्पाबाबत निविदा प्रक्रिया राबवण्यात येत आहे. तसेच शहरातील ओला व सुका कचरा वर्गीकरणावर भर दिला जाणार आहे.

- अनिलकुमार पवार, आयुक्त, महापालिका

लोकमत प्रा. नं. २.

# पोलिसांनी नोंदविली नव्हती श्रद्धा बेपत्ता झाल्याची तक्रार

## माणिकपूर पोलिस संशयाच्या भोवऱ्यात; तीन महिन्यांपूर्वीची घटना

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** तीन महिन्यांपूर्वीच श्रद्धा वालकर ही बेपत्ता असल्याची तक्रार तिच्या चुलत भावाने माणिकपूर पोलिस ठाण्यात नोंदवण्याचा प्रयत्न केला होता, मात्र माणिकपूर पोलिसांनी तक्रार न नोंदवता श्रद्धा परत येईल, असा अजब तर्क लावला होता. यामुळे माणिकपूर पोलिसच आता संशयाच्या भोवऱ्यात सापडले आहेत.

वसईतील श्रद्धा वालकर हिच्या दिल्लीत तिच्या प्रियकराकडून झालेल्या निर्घृण हत्येनंतर अवघा देश हादरला. श्रद्धाच्या मृतदेहाचे ३५ तुकडे करून त्याची विल्हेवाट लावणारा प्रियकर आफताब पूनावालाविरोधात देशभर संतापाची लाट उसळलेली असताना या संपूर्ण प्रकरणात आता वसईतील माणिकपूर पोलिस ठाणे वादात सापडले आहे.




■ दरम्यान, आरोपी आफताब पूनावाला याने श्रद्धाची हत्या करून तिच्या मृतदेहाची जंगलात विल्हेवाट लावल्याची कबुली दिली आहे. त्याने अनेक मुलींसोबत रिलेशनशिपमध्ये असल्याची कबुलीही दिल्याचे सूत्रांकडून कळते.

■ तीन महिन्यांपूर्वी श्रद्धाचा कोठेच थांगपत्ता न लागल्याने तिच्या चुलत भावाने तक्रार दाखल करण्याचा प्रयत्न केला होता, अशी माहिती या चुलत भावाने पोलिसांना दिली आहे. मात्र त्याचे नाव उघड करण्यात आलेले नाही.

### ९० दिवस आरोपी फिरला उजळमाथ्याने

१ श्रद्धाबाबतचे प्रकरण अधिक गंभीर होत गेल्याने माणिकपूर पोलिसांनी श्रद्धासंदर्भातली तक्रार नोंदवून तपास केला असता तर श्रद्धाच्या निर्घृण खुनाचा उलगडा लवकर झाला असता.


२ या तब्बल ९० दिवसांत माणिकपूर पोलिसांनी दाखवलेल्या बेपर्वाईमुळेच श्रद्धाचा मारेकरी ९० दिवस उजळ माथ्याने वावरत राहिला. माणिकपूर पोलिसांनी वेळीच तक्रार नोंदवून घेतली असती तर श्रद्धाच्या मारेकऱ्याला पकडण्यासाठी सहा महिन्यांचा कालावधी लागलाच नसता.

३ दिल्ली पोलिसांनी घेतलेल्या एका जबानीत श्रद्धाच्या चुलत भावाने हा धक्कादायक प्रकार समोर आणला आहे. मात्र आता श्रद्धाच्या चुलत भावाच्या जबानीनंतर माणिकपूर पोलिसाचा हलगर्जीपणा संशयाच्या भोवऱ्यात सापडला आहे.

### श्रद्धाच्या वडिलांचे आफ्ताबशी खटके

श्रद्धा वालकर हिचे वसईत राहत असताना अनेकदा आफताबबरोबर खटके उडाले. त्यासंदर्भात तिने तुळिंज पोलिस ठाण्यातही तक्रार दाखल केली होती, मात्र शेवटी आफताबने तिचा जीव घेतलाच. श्रद्धाची हत्या करून वसईत उजळ माथ्याने वावरणारा आरोपी आफताब पूनावाला हा माणिकपूर पोलिसांनी उशिरा दाखल केलेल्या तक्रारीमुळेच इतके दिवस गुन्हा करून उजळ माथ्याने वावरत राहिला, असे श्रद्धाच्या चुलत भावाचे म्हणणे आहे.

लोकसत्ता पु.पा.३.



# अनैतिक प्रकारांबद्दल मानवी हक्क आयोगाची तीव्र नाराजी

## जंजिरे धारावी किल्ल्याच्या जबाबदारीवरून शासकीय यंत्रणांची कानउघाडणी

**लोकसत्ता वार्ताहर**

**भाईंदर :** भाईंदर पश्चिम येथील ऐतिहासिक ह्यजंजिरे धारावीह्न किल्ल्यावर वाढत असलेल्या अनैतिक प्रकारांबाबत राज्य मानवी हक्क आयोगाने स्वतःहून दाखल केलेल्या याचिका प्रकरणाची सुनावणी बुधवारी पार पडली. या वेळी किल्ल्याचे संवर्धन करणे हे महत्त्वाचे असल्याचे प्रतिपादन न्या. के. के. तातेड (निवृत्त) यांनी केले.

भाईंदर पश्चिम येथील उत्तन परिसरात पेशवेकालीन जंजिरे धारावी किल्ला आहे. या किल्ल्याची पुरातत्त्व खात्याकडे नोंद नसल्यामुळे हा किल्ला गेली अनेक वर्षे दुर्लक्षित होता. त्यामुळे शहरातील अनेक दुर्गप्रेमींनी यावर संवर्धन मोहीम राबवली. त्यामुळे नुकतेच किल्ल्याच्या विकासासाठी राज्य शासनाकडून १० कोटी तर मीरा-भाईंदर पालिकेकडून ३ कोटी रुपयांचा निधी किल्ल्याच्या विकासासाठी मंजूर करण्यात आला आहे. परंतु हे काम तांत्रिक अडचणीमुळे रखडलेले असताना किल्ल्याच्या देखरेखीकडे प्रशासनाचे दुर्लक्ष झाले आहे. त्यामुळे किल्ल्यावर अनेक तरुण मद्यसेवन आणि इतर अनैतिक प्रकार करत असल्याचे उघडकीस आले होते.

या संदर्भात बातमी प्रकाशित झाल्यावर त्याची दखल घेत राज्य मानवी आयोगाने स्वतः पुढाकार घेत याचिका दाखल करवून घेतली होती. या संदर्भातील सुनावणी बुधवारी झाली. मीरा भाईंदर महानगरपालिका, ठाणे जिल्हाधिकारी कार्यालय, अतिरिक्त मुख्य सचिव, नगरविकास विभाग आणि प्रधान सचिव, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग यांना त्यांची बाजू सादर करण्याचे आदेश देण्यात आले होते.

या वेळी सुनावणीला महानगरपालिकेच्या वतीने विधि अधिकारी सई वडके आणि ठाणे जिल्हाधिकाऱ्यांच्या वतीने अभियंता निखिल उपस्थित होते. किल्ल्यावर संवर्धन मोहीम राबवणारे रोहित सुवर्ण यांनी अर्ज देऊन या सुनावणी प्रक्रियेत सहभाग घेतला. सुनावणी सुरू होताच पालिकेच्या विधि अधिकाऱ्यांनी किल्ल्याची जबाबदारी पालिकेची नसल्याचे सांगितले. या संदर्भातील कागदपत्रे जमा करण्यासाठी वेळ मागून घेतली. यावर न्या. के. के. तातेड (निवृत्त) यांनी पालिकेसह इतर शासकीय यंत्रणांना धारेवर धरले. जंजिरे धारावी किल्ल्याचे संवर्धन महत्त्वाचे आहे. यात मीरा भाईंदर वसई विरार पोलीस आयुक्तालय आणि संचालक पुरातत्त्व आणि वस्तुसंग्रहालय महाराष्ट्र शासन यांनाही प्रतिवादी करण्याचे त्यांनी आदेश दिले. शिवाय सर्व विभागांनी आयोगाकडे ९ डिसेंबरपर्यंत म्हणणे लेखी स्वरूपात सादर करण्याचे स्पष्ट केले. यावर १३ जानेवारी रोजी पुढील सुनावणी होणार आहे.